माहितीचा अधिकार

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये दाखल तक्रार

तक्रार क्रमांक -११८८ /२०२४ /पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे-१

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| भारती रोहिदास कामठे | जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक (माध्यमिक ) जिल्हा परिषद कार्यालय पुणे<br>मुख्याध्यापक, स्व. बबनराव खंडूजी कामठे माध्य. विद्यालय, कोंढवा, येवलेवाडी रोड, पुणे | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद कार्यालय पुणे |

**(निर्णय दिनांक- २०/०५/२०२५)**

तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ नुसार दोन तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रारी मध्ये 'आयोगाचे आदेश पारित होवूनही आदेशाची अमलबजावणी ', अशा आशयाची तक्रार आयोगाकडे केलेली आहे.

आयोगाने द्वितीय अपील क्रमांक-२६१३/२०२३/पुणे यामध्ये दिनांक-३०.१०.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (७) नुसार आयोगाचा निर्णय सार्वजनिक प्राधिकरणावर बंधनकारक आहे. त्यानुसार आयोगाच्या आदेशानुसार अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (९) नुसार राज्य माहिती आयोग तक्रारदाराला व सार्वजनिक प्राधिकरणाला आपल्या निर्णयाबाबत तसेच अपिलाच्या कोणत्याही हक्काबाबत कळवील, अशी तरतूद आहे.

प्रस्तुत प्रकरणात आयोगासमोर उपलब्ध असलेल्या अभिलेखावरून असे स्पष्ट होते की, आयोगाने पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. सदर प्रकरणात शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद कार्यालय पुणे यांनी वर नमूद द्वितीय अपीलामध्ये आयोगाने दिलेल्या आदेशानुसार सदरचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात कार्यवाही करावी व त्याबाबतचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

### आदेश

वरील निर्देशासह तक्रारदार यांचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र सत्यमेव जयते पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

तक्रार क्रमांक -११८८ /२०२४ /पुणे 1989/2025

दिनांक - 2/6/2025

रामाआ-पुणे/२०२५/RCG